RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १२(३१)] शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ७४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **४ जुलै, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा **नियम ११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. LXX OF 2025.**

A BILL

TO AMEND THE HINDU MINORITY AND GUARDIANSHIP ACT, 1956 IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७०.**

**हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम, १९५६ हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यामध्ये सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**ज्याअर्थी,** पित्याच्या हयातीत, हिंदू अज्ञान व्यक्तीच्या देहासंबंधात तसेच अज्ञान व्यक्तीच्या संपत्तीसंबंधात अज्ञान व्यक्तीचे नैसर्गिक पालक असण्यामधून मातेला ती केवळ स्त्री आहे या कारणावरून वगळणे हे भारताच्या संविधानात अंतर्भूत असलेल्या समानतेच्या हक्काच्या तत्वाशी विसंगत आहे ;

**आणि ज्याअर्थी,** महिलांच्या कल्याणास चालना देण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने अलिकडेच एक धोरण जाहीर केलेले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** महिलांच्या संबंधातील उक्त धोरणामध्ये इतर गोष्टींबरोबरच, मुलगा किंवा अविवाहित मुलगी यांचे नैसर्गिक पालक असण्याचे समान हक्क हिंदू पिता आणि माता यांना प्रदान करण्यासाठी तरतूद केलेली आहे ;

**आणि ज्याअर्थी,** हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम, १९५६ हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना पूर्वोक्त प्रयोजनांकरिता त्यात आणखी सुधारणा करणे आवश्यक वाटते.

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, हिंदू अज्ञानत्व व पालकत्व (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०२५ असे म्हणावे.

(२) तो राज्य शासन, **राजपत्रात** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा तारखेस अंमलात येईल.

सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ६ ची सुधारणा.

**२.** हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम, १९५६ हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ६ मधील खंड (क) मध्ये " त्याच्या पश्चात " या मजकुराऐवजी " तसेच " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ३२ मध्ये ७ दाखल करणे.

**३.** मुख्य अधिनियमातील कलम ७ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

दत्तक पुत्राचे आणि कन्येचे नैसर्गिक. पालकत्व.

अशा दत्तक पुत्राचे आणि कन्येचे नैसर्गिक पालकत्व दत्तक विधानानंतर दत्तकग्राही पित्याकडे आणि दत्तकग्राही मातेकडे जाते.

सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ३२ मध्ये याच्या कलम ९ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९ मध्ये,—

(एक) पोट-कलम (१) मधील "स्वतःच्या अज्ञान औरस अपत्याचा नैसर्गिक पालक म्हणून कार्य करण्यास हक्कदार असलेल्या हिंदू पित्याला" या मजकुराऐवजी "त्यांच्या अज्ञान औरस अपत्यांचे नैसर्गिक पालक म्हणून कार्य करण्यास हक्कदार असलेल्या हिंदू पित्याला आणि तसेच मातेला एकमेकांच्या संमतीने, संयुक्तपणे किंवा पृथकपणे हा मजकूर दाखल करण्यात येईल,

(दोन) पोट-कलम (२) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (२) जर विवाहसाथीतील दोहोंपैकी एक आधी मृत्यू पावला तर, पोट-कलम (१) खाली करण्यात आलेली नियुक्ती कोणत्याही प्रकारे परिणामकारक होणार नाही. अशा बाबतीत हयात विवाहसाथीस त्याच्या किंवा तिच्या पसंतीने मृत्यूपत्राद्वारे दुसरा पालक नियुक्त करण्याचा हक्क असेल. दोघेही विवाहसाथी एकाच वेळी किंवा थोड्या कालावधीच्या मृत्यू पावल्यास त्यांच्या मृत्यूच्या लगतपूर्वी अस्तित्वात असलेले संयुक्त मृत्यूपत्र किंवा एका विवाहसाथीने दुसऱ्याची स्पष्ट संमती घेऊन त्यानंतर केलेले मृत्यूपत्र पुनरुज्जीवित होईल :

परंतु, जर नंतर केलेल्या मृत्यूपत्रान्वये नियुक्त केलेल्या पालकाचा मृत्यू झाल्यास किंवा मृत्यूपत्रीय पालक म्हणून कार्य करण्यास असमर्थ ठरल्यास किंवा स्वतःअपात्र ठरल्यास, लगतनंतरच्या मृत्यूपत्रापूर्वीच्या मृत्यूपत्रान्वये केलेली नियुक्ती पुनरुज्जीवित होईल आणि अशा प्रकारे नियुक्ती करण्यात आलेली व्यक्ती मृत्यूपत्रीय पालक होईल ".

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

अज्ञान व्यक्तीच्या देहासंबंधात आणि संपत्ती संबंधात हिंदू अज्ञान व्यक्तीचे नैसर्गिक पालक म्हणून काम करण्यास कोणत्या व्यक्ती हक्कदार असतील ते सांविधिक स्वरुपात घोषित करणे, अशा पालकांच्या अधिकारांवर विवक्षित निर्बंध घालणे हा हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम, १९५६ या अधिनियमाचा उद्देश आहे.

उक्त अधिनियमाच्या कलम ६ च्या तरतुदीन्वये पिता हा अज्ञान मुलगा व अज्ञान अविवाहित मुलगी यांच्या देहासंबंधाचा तसेच संपत्तीचा नैसर्गिक पालक असतो आणि केवळ त्याच्या पश्चात माता ही अशा अज्ञान व्यक्तीच्या देहासंबंधाची तसेच संपत्तीची नैसर्गिक पालक असते. पुरुष आणि महिलांमध्ये पालकत्वाच्या संबंधात केल्या जाणाऱ्या भेदभावाच्या प्रश्नाची चर्चा महिला संघटनांनी आणि इतर अनेक मंचांनी केली आहे. मातेला तिचा पती हयात असला तरीसुद्धा, तिच्या अज्ञान अपत्त्यांचे नैसर्गिक पालकत्व देण्यात यावे अशी भूमिका अनेक महिला संघटनांनी मांडली आहे. अज्ञान अपत्यांच्या नैसर्गिक पालकत्वाच्या संबंधात पुरुषाप्रमाणे स्त्रिला समान दर्जा देणे हे भारताच्या संविधानामध्ये अंतर्भूत समानतेच्या हक्काच्या तत्त्वाशी सुसंगत ठरेल. महिला आयोगाने या प्रश्नाचा तपशिलवार विचार केला आहे. विविध संघटना, विधी तज्ज्ञ आणि अनेक व्यक्ती यांच्याशी याबाबतीत चर्चा केली आहे आणि ते अशा निष्कर्षाप्रत आलेले आहेत की, मातेला नैसर्गिक पालक होणे शक्य व्हावे म्हणून हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियमामध्ये योग्य त्या सुधारणा करण्यात याव्यात. मातेलादेखील पालक होणे शक्य व्हावे यासाठी पालकत्व अधिनियमात सुधारणा करण्याचे आपले धोरण महाराष्ट्र शासनाने दिनांक २२ जून, १९९४ रोजी जाहीर केले होते.

ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम, १९५६ याची कलमे ६, ७ व ९ यात योग्य त्या सुधारणा करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ३० जून, २०२५.

**सुधीर मुनगंटीवार,**
प्रभारी सदस्य.

**वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन.**

या विधेयकात वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहे—

**खंड १.**—(२).—या खंडाद्वारे, राज्य शासनास, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वार नियुक्त करील अशा दिनांकास हा अधिनियम अंमलात आणण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा वरील प्रस्ताव सामान्य स्वरूपाचा आहे.

**विधान भवन :**

मुंबई,

दिनांक ०४ जुलै २०२५.

**जितेंद्र भोळे,**

सचिव (१),

महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.